लोकमत

# कौटुंबिक हिंसाचार रोखण्यास 'आशा' कार्यकर्त्यांचा पुढाकार

## गावपातळीवर प्रतिबंधासाठी कायदेशीर मदत देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** आता आशा कार्यकर्त्या केवळ हिंसाचारग्रस्त महिलांचे सांत्वन करणार नाहीत, तर त्यांना कायदेशीर सल्ला, संस्थांची माहिती आणि मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणार आहेत. गावांमधील कौटुंबिक हिंसाचार वेळीच ओळखून त्याला प्रतिबंध करण्यासाठी आशांची भूमिका अधिक प्रभावी ठरणार आहे.

जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने 'मासूम, सेहत, डब्ल्यूएचओ, यूके एड आणि व्हॉट वर्क्स' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने संभाजीनगर व मराठवाडा प्रशासकीय प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण येथे आशांसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणात ६१६ आशा कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत कौटुंबिक हिंसाचाराच्या संकेतांची वेळेवर ओळख, महिलांना प्राथमिक आधार, त्यांना योग्य संस्थांपर्यंत पोहोचवणे आणि आरोग्य केंद्र पातळीवर मदत उपलब्ध करून देणे, या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. प्रफुल्ल ताकवाले, डॉ. राहुल गवई, सखू शेलार, मनीषा बोबडे, रोहित कुलकर्णी आदींनी विविध सत्रांतून प्रशिक्षण दिले. यात सीमा देवधर व श्रीनाथ लक्ष्मीशंकर यांनी 'लिंगभाव व पितृसत्ता', शैलजा आराळकर यांनी 'महिलांवरील हिंसाचार आणि लिंगाधारित भेदभाव' तर सोनाली सुतार यांनी 'हिंसाचारग्रस्त महिलांशी संवाद कौशल्य' याबाबत मार्गदर्शन केले. काजल जैन व डॉ. प्रिया प्रभू यांनी कायदे व सहाय्य यंत्रणा स्पष्ट करून सांगितली.